RNI NO. MAHMUL/2010/34781

ISSN 2230-8024

ADAT VAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# शोध संपदा


## SHODH SAMPADA

आंतरराष्ट्रीयस्तरीय प्रतिष्ठित संशोधन नियतकालिक

वर्ष ७ वे

नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१७

अंक २६ वा



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

संपादक

RNI NO. MAHMUL/2010/34781 ISSN 2230-8024

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# शोध संपदा

## SHODH SAMPADA

आंतरराष्ट्रीयस्तरीय प्रतिष्ठित संशोधन नियतकालिक

वर्ष ७ वे, नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१७

अंक २६ वा

: संपादक :

डॉ. राजशेखर सोलापुरे

: सहसंपादक :
डॉ. विश्वाधार देशमुख

: उपसंपादक :
प्रा. डॉ. शैलजा बरुरे

: संपादन सहाय्यक :
प्रा.डॉ.सुनिल पुरी

: संपादकीय सल्लागार मंडळ :

खा. डॉ. जनार्दन वाघमारे
राजन खान
डॉ. अरुणचंद्र शं. पाठक
प्रा. गंगाधर हिंगोले
प्रा. भास्कर चंदनशिव
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. बाबुराव गुरव
डॉ. नागोराव कुंभार
सु.ग.जोशी
डॉ. वीरण्णा राजूर
डॉ. सूर्यकांत घुगरे
प्रा. ओमप्रकाश होळीकर

: वितरक :
प्रा. राजकुमार बिरादार

: जाहिरात प्रमुख :
सुशिल कोरे

: संपादकीय पत्रव्यवहार :
डॉ. राजशेखर सोलापुरे
संत ज्ञानेश्वर नगर, रिंग रोड जवळ, लातूर
मो.नं. 09423345822
Email-rajshekhar.solapure @gmail.com

| | वार्षिक वर्गणी | त्रैवार्षिक वर्गणी |
|---|---|---|
| ■ व्यक्ती | ४०० रु. | ८०० रु. |
| ■ संस्था | ५०० रु. | १००० रु. |

■ अंकाचे मूल्य - १०० रु.

■ शोध संपदा या त्रैमासिकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मताशी मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

■ शोध संपदा हे त्रैमासिक मुद्रक, मालक, संपादक, प्रकाशक सोलापुरे राजशेखर शशिकांत यांनी प्रवर्तन ऑफसेट प्रिंटर्स, संत ज्ञानेश्वर नगर, रिंग रोड जवळ, लातूर महाराष्ट्र येथे छापून तेथेच प्रकाशित केले आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *


❁ चिकित्सा ❁

९. भारतीय संघराज्य : उदय व विकास संदर्भाचे विश्लेषण
प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे ........................................ ५७

❁ समस्या व समाधान ❁

१०. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे व उपाय
सचिन ढेंगळे ........................................ ६८

११. शेतकऱ्यांच्या आत्महत्या : वास्तव, कारणे व उपाय
परमेश्वर भोसले ........................................ ७३

❁ व्यक्तीवेध ❁

१२. सत्य व अहिंसेचे अग्रदूत: राष्ट्रपिता महात्मा गांधी
प्रा. संजयादेवी पवार ........................................ ७७

❁ स्त्रीवादी साहित्य ❁

१३. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचे योगदान
प्रा. अर्चना धनवे ........................................ ८१

14. Finding Her Space: A study of Anita Nair's Ladies Coupe and Manju Kapur's Difficult Daughters
**Ahilya Barure** ........................................ 90

❁ अनुशीलन ❁

१५. साठोत्तरी कादंबरीतील दुष्काळ आणि दारिद्र्याचे मानवी जीवनावरील परिणाम
वंदना बालटकर ........................................ ९५

❁ परस्परपुरकता ❁

१६. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध
सुरेंद्र कोंडेकर ........................................ ९८


❁❁❁

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

# १. भारतीय संघराज्य : उदय व विकास संदर्भाचे विश्लेषण

प्रा.डॉ. रत्नाकर लक्षटे , देगलूर

कोणत्याही नव स्वतंत्र राष्ट्रसमोर अनेक प्रश्न असतात. यात प्रामुख्याने स्वातंत्र्यानंतर कोणती शासनव्यवस्था, स्विकारावी. जी आपल्या देशाच्या ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय व मानसिकतेचे प्रतिबिंबित्व स्पष्ट करणारी असेल. स्वातंत्र्यानंतर भारताने कोणत्या शासन व्यवस्थेचा स्विकार करावा ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी संविधान सभेची स्थापना केली. संविधान सभेने भारतीय संस्कृती,समाजव्यवस्था इतिहास इ.घटकांचा विचारकरुन संघराज्य शासन व्यवस्थेचा ठाचा स्विकारला.

संघराज्य समाज, संस्कृती,राजकारणाच्या अनेकसत्तावादी स्वरुपाचे राजकीय नियोजन आहे. संघराज्य स्वशासन आणि करारात्मक शासनाची संविधानिक संरचना आहे. संघराज्य स्वायत्तता आणिराष्ट्रीयत्वाच्या अभिव्यक्तिचे राजकीय शिक्षण आहे. त्याचे स्वरुप अनेकसत्तावादी व समन्वयवादी आहे. उद्देश एकीकरणाचा आहे. संघराजय अशा राष्ट्रराज्यात पुषित असते जेथे अनेकसत्तावादी समाजाच्या सुनिश्चित केले जाते. राजकीय सहभागास अधिकाधिक व्यापक बनवले जाते.सार्वभौम शक्तीला मर्यादित व विभाजीत केले जाते. केंद्र आणि केंद्राच्या इतर घटकात पारपारिक निर्भरता आणि सहकार्यास निश्चित केले जाते. यात केंद्र आणि केंद्राच्या इतर घटकांच्या सामुहिक विकासाचा आधार राष्ट्रीयत्व असते. तसेच सार्वजनिक विकासाचा आधार स्वायतत असते. संघराज्य केंद्र आणि राज्यात फक्त सत्तेचे विभाजन नाही तर विविधतापुर्ण समाजाची राष्ट्रीय जीवनपध्दती आहे.

**संशोधनात्मक आराखडा**

प्रस्तुत लेखात भारताने संघराज्य शासन व्यवस्थेचा ठाचा स्विकारण्यास पुरक ठरणारे कोणकोणते घटक येथील व्यवस्थेत आहेत, यावर प्रकाश टाकण्यात आला. तसेच वर्तमान संघराज्य व्यवस्था कशी विकसित झाली ? याचा सामाजिक व ऐतिहासिक आढावा घेण्यात आला. तो घेताना ऐतिहासिक व ग्रथालयीन अभ्यासपध्दतीचा आधार घेतला.

आधुनिक युगात सर्वात प्रथम संयुक्त राज्य अमेरिकेत 1787 साली संघराज्य राज्यघटना व शासनाची स्थापना झाली. तद्नंतर 1948 साली स्वित्झर्लंड,1867 साली कॅनडा, 1901 साली ऑस्ट्रेलिया आणि 1917 साली सोविएत रशियात उदय झाला. भारतात स्वातंत्र्यानंतर म्हणजेच 26 जानेवारी 1950 ला राज्यघटना लागु करण्यात आली. तेव्हापासूनच संघराज्य व्यवस्थेचा प्रारंभ झाला. परंतु भारताने कॅनडा, अमेरिका, सोविएत रशिया, स्वित्झ र्लंडप्रमाणे स्वायत्त, शुध्द संघात्मक, एकाधिकारवादी संघराज्याचा स्विकार केला नाही. भारताने

...सगळ्या केंद्रीय स्वायत्त शासनव्यवस्थांचा स्विकार केला.

भारतीय संघराज्य भारताच्या ऐतिहासिक परिस्थिती व सामाजिक रचनेचा परि... आहे. यामुळेच अमेरिकन अध्यक्षीय संघराज्याप्रमाणे नाही. तसेच कॅनडाचे संसदीय संघरा... व स्वित्झर्लंड परिषद संघराज्याप्रमाणे नाही. यास समजुन घेतल्याशिवाय भारतीय संघराज्या... आकलन होणार नाही. भारतात स्वातंत्र्य मिळण्याअगोदर आणि संविधान निर्मितीवेळेस क... राजकीय समस्या आणि परिस्थिती निर्माण झाल्या. ज्याचे समाधान केल्याशिवाय ब्रिटीश शासन... सत्ता हस्तांरणासाठी तयार नव्हते. यात प्रामुख्याने खालील परिस्थितीचा विचार करता येतो.

1) स्थानिक संस्थाने आपली स्वतंत्र ओळख आणि सत्तेशी संबधीत सोई-सुविधापु... स्वातंत्र्यासाठी तयार नव्हते.

2) मुस्लिम लिंग हिंदुचे बहुल वर्चस्व असणाऱ्या कोणत्याही घटनात्मक तरतुदीं... स्विकारण्यास तयार नव्हते.

3) भारतातील अल्पसंख्याक समुह आपली सुरक्षा, स्वायतता व विकासाच्या प्रक्रियेला निश्चित केल्याशिवाय स्वातंत्र्यासाठी तयार नव्हता.

4) राष्ट्रीय काँग्रेस लोकशाही मुल्य व राष्ट्रीय स्वरुप नसणाऱ्या कोणत्याही घटनात्मक तरतुदींना स्विकारण्यास तयार नव्हते.

5) जोपर्यंत संस्थाने व मुस्लिम लीग यांच्यात सांमजस्य होत नाही. तोपर्यंत ब्रिटीश शासन भारतास स्वातंत्र्य देण्यास तयार नव्हते.

अशा सर्व परिस्थिती व समस्यांचे समाधान असणाऱ्या घटनात्मक तरतुदीचा शोध घेवुन त्या व्यवस्थेचा स्विकार करणे स्वातंत्र्य सैनिक व घटनाकारांना आवश्यक झाले. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली लोकमानसाचा आधार मिळालेला राष्ट्रीय काँग्रेस पक्ष 1930 च्या संघराज्य व्यवस्थेविषयी सायमन कमीशनचा प्रस्ताव, 1935 चा भारत शासन अधिनियम, मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली गठित नेहरु समितीचा अहवाल, 1946 सालच्या कॅबिनेट मिशनचा अहवाल इ. बाबी भारतीय संविधानात संघराज्य स्थापन करण्याच्या दिशेने नेणाऱ्या आहे. कॅबिनेट मिशन योजनेच्या आधारे 1946 साली संविधान सभेची स्थापना झाली. परंतु भारताच्या फाळणीनंतर देशाची परिस्थिती बदलली. घटनाकारांच्या वैचारिक बांधणी व जडणघडणीत फाळणीने आमुलाग्र बदल घडवले. अशा बदलत्या परिस्थितीत भारतासाठी स्थैर्य व सुरक्षितता हा भाग महत्वाचा बनला. भावनेपेक्षा दक्षता महत्वाची बनली. संघराज्यापेक्षा अधिक महत्वाची मुद्दापुढे आला तो म्हणजे भारतात फाळणीमुळे निर्माण झालेल्या सांप्रदायिक व विघटनकारी शक्तीवर नियंत्रण मिळवणे. कारण या शक्ती भारतीय जनतेत स्वातंत्र्य संकल्पनेविषयीचा नकारात्मक व स्वैराचाराचा भाव उत्पन्न करत होता परिणामतः दिशाहीन भारताचे चित्र जगासमोर येत होते.

भारतीय घटनाकारांनी या सगळया घटनाक्रमाचा अभ्यास करुन भारतासाठी सर्वसमावेशक संविधान बनवले. या संविधानात कोणत्या शासनव्यवस्थेच्या प्रक्रियेचा स्विकार करावा याविषयी संविधान सभेच्या सदस्यांनी अनेक विचार मांडले. कॅबिनेट मिशन संदर्भात

बोलताना नेहरु म्हटले यात केंद्रीय सत्तेच्या अधिकार क्षेत्रावर टाकलेल्या मर्यादा म्हणजे एक करार आहे, ज्यास संविधान सभेने देशाच्या प्रशासकीय अपेक्षांच्या विरुध्द मुस्लिम लीगला समायोजित करण्यासाठी स्विकारले. आज देशाची फाळणी हे अंतरिम सत्य बनले. अशा वेळी संघात्मक राज्यघटनेची निर्मिती राजकीय आणि प्रशासकीय दोन्ही दृष्टीने एक प्रतिगामी पाऊल असेल केंद्रीय संविधान समिती व नेहरुंनी आपल्या प्रस्तावात निर्णय घेतला की, आमच्या राज्यघटनेची रचना शक्तिशाली केंद्रासोबत एका संघीय प्रणालीची असेल.

भारताच्या फाळणीने घटनाकारांपुढे अनेक बाबींची स्पष्टता झाली. परिणामत: संविधान सभेच्या गठन प्रक्रियेत बदल झाला. कार्यप्रणालीचे संचलन, आम सहमती आणि समन्वयवादी निर्णय निर्धारण प्रक्रियेचा केलेला स्विकार पाहता हे स्पष्ट झाले की, घटनाकार फक्त राज्यघटनाच निर्माण करत नव्हते तर राष्ट्राचा एक समन्वयवादी व समायोजनावादी आराखडा निर्माण करत होते. घटनाकारांनी संविधानातून मांडलेल्या खालील काही मुदयाकडे नजर टाकता लक्षात येते की, ते भारतीय समाज, संस्कृती व राजकारणाच्या विविधतावादी स्वरुपा संगमाच्या राजकीय नियोजनाप्रती घटनाकाराची प्रतिबध्दता स्पष्ट होते. यामध्ये प्रामुख्याने समतेच्या अधिकारासोबतच मुलभूत अधिकारात धार्मिक स्वातंत्र्य,शिक्षण व संस्कृतीचा अधिकार, अल्पसंख्याच्या हिताची सुरक्षतता, संपत्तीचा अधिकार देवुन सरंजामदार व भांडवलवादयांच्या हितास सुरक्षित केले. प्रिंवीयर्स आणि बी श्रेणीच्या राज्यात राजप्रमुख पदाची व्यवस्था करुन राजाच्या हितास सुरक्षित केले. मुलभूत अधिकार, संसदीय प्रणाली, स्वतंत्र न्याय व्यवस्था, राज्यघटना आणि संसदेस राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार राज्यघटनेस सर्वसामान्य जनता आणि विभिन्न समुहांच्या बदलत्या अपेक्षानुरूप बनवण्याची व्यवस्था केली.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या विविधता संपन्न देशात एकता निर्माण करणे घटनाकारांचे मुख्य लक्ष होते. त्यासाठीच राज्यघटनेतुन एकीकरणाचा सिध्दांत स्विकारला. राज्यघटनेत कोठेही धर्मनिरपेक्ष या शब्दाचा वापर केला नाही. परंतु संपूर्ण घटनात्मक व्यवस्थेस धर्मनिरपेक्षतावादी बनवुन अल्पसंख्यांकात असलेल्या असुरक्षेच्या भावनेला राष्ट्रीयत्वात रुपांतरीत करण्याची व्यवस्था केली. संसदीय शासन प्रणालीचा स्विकार करुन देशाच्या सर्वक्षेत्र व समुहातील प्रतिनिधींना राष्ट्रीय, प्रांतीय व स्थानिक समस्यांवर विचारविनिमय करण्यासाठी व विविध समस्यांवर तोडगा शोधून शासनावर दबाव टाकण्यासाठी एक सर्वशक्ती संपन्न संसदेची स्थापना करण्यात आली. राज्यात घडणाऱ्या घडामोडी व हालचालीबाबत केंद्रास माहिती मिळाली म्हणून सर्व राज्यात केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्यपालाची व्यवस्था करण्यात आली. निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय सहभागास व्यापक बनवण्यासाठी जात, वर्ग, संप्रदाय व प्रदेशाच्या आधारावर विभागलेल्या जनइच्छांना पक्षीय सिध्दांत व पक्षीय कार्यक्रमाच्या आधाराने संस्थात्मक स्वरुप देण्याची व्यवस्था करण्यात आली.

धर्मनिरपेक्ष शब्दाप्रमाणेच घटनाकारांनी राज्यघटनेत राजकीय पक्षाविषयी कोणतीच तरतुद केली नाही. कारण भारत हा विविधतेने नटलेला समाज आहे. या समाजात निर्माण व विकसित होणारे नवनवीन सामाजिक हित व अपेक्षेनुरुप घटनात्मक संघराज्यास स्वतंत्ररित्या

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

व्यवस्थित करण्याची जबाबदारी राजकीय पक्षांवर टाकू इच्छितात. कारण कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे संचलन फक्त राज्यघटना व कायदयाने होत नसून लोक मानसिकता व प्रवृत्तीने होते. राजकीय पक्ष याच लोकप्रवृत्तीचे प्रतिक व प्रतिनिधीत्व असते. जे विविधतेस एकतेत रुपांतरीत करते. राजकीय पक्षच आपल्या संघराज्य संरचनेच्या माध्यमातून स्वायत्त व राष्ट्रीयत्वाच्या समन्वित विकासाची पार्श्वभुमी तयार करतात. संघीय घटकांच्या सामुहिक व खाजगी व्यक्तिमत्व विकासाचे नियोजन करतात. राजकीय पक्षाच्या या समावेशी स्वरुपामुळेच घटनाकारांच्या सर्व अपेक्षा त्यावेळच्या राष्ट्रीय काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या संघात्मक संरचनेवर आधारित होत्या.

परंतु स्वातंत्र्यापासुन ते आजपर्यंत राजकीय पक्षांची वाटचाल पाहता दुर्भाग्याने म्हणावेसे वाटते की, राजकीय पक्षाच्या संशयित नेतृत्वाने सर्वसमावेशक स्वरुपास संपवले. राजकीय पक्ष प्रादेशिक व जातीय हितांच्या आधारे विभागले व निर्माण झाले. त्यांच्यातील संघात्मक संरचना व स्वरुप विकृत व निष्प्रभ बनत गेले. आज एकही राजकीय पक्ष असा नाही की, जो राष्ट्रीयत्वाच्या संदर्भाने विकासाचे वातावरण निर्माण करु शकेल. संघराज्याच्या अपेक्षेनुरुप स्वतःस संघटित व विकसित करेल.

या मांडणीतुन हे समजुन घेण्याचा प्रयत्न केला की, कशाप्रकारे पक्षीय पध्दतीतील बदलासोबत राज्यघटना निर्मात्यामार्फत कल्पिलेल्या संघराज्याच्या स्वरुपात बदल झाला. भारताच्या बदलत्या राजकीय वातावरणात घटनात्मक संघराज्याचा उदय झाला. ज्याची अपेक्षा घटनानिर्मात्यांनी केली नव्हती. कशाप्रकारे संघराज्याची संरचना व पक्षीय संरचनेत तादातंम्य नष्ट होत गेले. पक्ष पध्दती संघराज्य व्यवस्थेला सृजनात्मक स्वरुप देण्यात असमर्थ ठरली. पक्षपध्दती संघराज्याच्या राष्ट्रीय व प्रादेशिक स्वरुपाला घटनाकर्त्यांच्या इच्छेनुसार व्यवस्थित ठेवण्यात असमर्थ ठरली. कशाप्रकारे संघ व संघाचे विविध अंगातील परस्परावलंबीता व सहकार्याची भावना कमी झाली. अंततः शेवटी सौदेबाजीच्या संघराज्याचा विकास झाला.

स्वातंत्र्यानंतर नेहरुंच्या नेतृत्वात ज्या संघराज्य शासनाचा उदय झाला, ते राज्यघटनेत नमुद केलेल्या संघराज्याच्या मानकांना सुदृढ आधार देण्यात यशस्वी झाले. कारण त्यांच्याकाळातील राष्ट्रीय काँग्रेसची सशक्त संघटनात्मकता, नेतृत्व निर्माण करण्याची प्रक्रिया आणि निर्णय निर्धारण प्रक्रिया घटनात्मक संघराज्याच्या अपेक्षेनुरुप होती. तसेच पक्षांचे संस्थात्मक स्वरुप सुदृढ व सृजनात्मक होते. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने स्थापन केलेले शासन सर्व समाजाच्या अपेक्षानुरुप का करत होते. संघराज्य शासन पध्दतीची बांधणी व संचलित करण्यात लोकशाही मुल्यांना प्राधान्य दिले जात असत.

नेहरु आणि शास्त्रींच्या काळात राज्यात त्याच व्यक्तींना मुख्यमंत्री होण्याचा मान व संधी मिळाली ज्यांची कार्यप्रणाली लोकहितास प्राधान्य देणारी होती. ज्यांचे व्यक्तिमत्व सर्वगुण संपन्न होते. जे त्या राज्यातील सर्वाधिक लोकप्रिय व प्रभावशाली व्यक्ति होते. ज्यांचे विचार राष्ट्रीय मुल्य आणि घटनात्मक मुल्यानुरुप होते. त्याकाळात केंद्र आणि राज्य दोघांच्या सहमतीने राज्यपालाची निवड होत असत. राज्यपाल पण आपल्या कार्यात घटनात्मक मुल्यांना प्राधान्य

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

देत. याकाळात केंद्र आणि राज्य परस्परावलंबीता आणि सहकार्यांच्या आधारावर देशाच्या विकासाचा रथ पुढे नेत. नेहरुमार्फत स्विकारण्यात आलेल्या सर्वमान्यता व समायोजनाचे धोरण संघ आणि त्याच्या घटकात सर्वसंबंधाच्या विकासाचा मार्ग सुकर केला.

त्याकाळात मुख्यमंत्र्याच्या मार्गदर्शनात राज्याची स्वायत्तता व विकास तीव्र गतीने विकसीत झाले. त्याकाळातील राष्ट्रीय मुख्यमंत्र्यात गोविंद वल्लभपंत आणि चंद्रभानु गुप्त (उत्तरप्रदेश) कृष्णसिंह (बिहार) विधानचंद्र राय (पश्चिम बंगाल) कामराज (मद्रास) निजलिंगप्पा (म्हैसुर) ई. प्रमुख होते. दामोदर घाटी निजामच्या संरचना व कार्यक्षेत्रासंबंधी तत्काळातील मुख्यमंत्री विधानचंद्र राय यांनी शंका व्यक्त केली १९५६ साली राज्याच्या पुनर्रचनेबाबत केंद्र आणि राज्यात अधिक संघर्ष झाला. परंतु त्यावेळी अशाप्रकारचे अनेक मतभेद पक्षनेतृत्व आणि वरिष्ठ नेत्यांच्या सहकार्याने पक्षांत मिटवले जात. त्याकाळात केंद्र - राज्य संबंध राज्यघटनेतील कलमाऐवजी पक्षाच्या नेतृत्व, पंतप्रधान आणि कॉंग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्याच्या महत्वपूर्ण भूमिकेतून निर्धारित होत.

स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने पंडित नेहरुंनी भारतीय राज्यघटनेमार्फत सांगितलेल्या संघराज्याच्या विकासाचा मार्ग प्रशस्त केला. या मार्गावरुन जाता नेहरुंनी घटनात्मक परंपराचा विकास केला. घटनात्मक संरचनेचे संस्थानिकरण केले. विविधतांचे योग्य पध्दतीने एकीकरण केले. संसदीय प्रक्रियांचे सुदृढीकरण करुन सामाजिक व्यवस्थेच्या पारंपारिकतेच्या रुपांतरणाची व्यवस्था केली. भारतीय संविधानातील संघराज्य आणि संसदीय संस्थांचे जे चित्र नेहरुंनी उभे केले व त्याअंतर्गत ज्या कार्यप्रणाली व संस्कृतीचा विकास केला स्थानिय स्तरापासुन राष्ट्रीय स्तरापर्यंत निवडणुकीच्या माध्यमातुन सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा व महत्वकाक्षांना पूर्ण करण्यासाठी जे राजकीय नियोजन केले, केंद्र आणि राज्यातील संबंधाना ज्याप्रकारे संघात्मक प्रक्रियेतुन एकीकरणास प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले, या सर्वबाबी भारताचे भविष्य घडवण्यात व नवनिर्माणात मोलाचा दगड सिध्द झाले.

यासोबतच नेहरुंनी पक्ष आणि शासनाच्या संघात्म स्वरुपावर प्रहार करुन त्यास नुकसान पोहचवण्याच्या प्रक्रियेचे बीजारोपण केले. सरदार वल्लभभाई पटेलांच्या मृत्युनंतर कॉंग्रेस अध्यख पुरुषोत्तम दास टंडन यांचा पद सोडण्यास मजबूर करुन स्वत: पार्टी अध्यक्ष पद ग्रहण केले. चार वर्षाने पद सोडल्यानंतर आपल्या आवडीच्या व्यक्तीस अध्यक्ष पदावर बसवणे ही प्रक्रिया भविष्यातील पक्षाच्या संघात्मक स्वरुपास नष्ट करण्यातील महत्वपुर्ण पाऊल ठरली. याशिवाय नेहरुंनी राजस्थानच्या पटेलवादी मुख्यमंत्री गोपीनाथ भार्गव यांनाही पदाचा त्याग करण्यासाठी मजबूर करुन संघराज्याच्या घटनात्मक स्वरुपाला आघात पोंहचवले. सार्वत्रिक निवडणुकानंतर केरळचे नंम्बुदीपाद यांच्या नेतृत्वाखाली बनलेल्या साम्यवादी शासनास बडतर्फ करुन राष्ट्रपती शासन लागू करुन संघराज्य व्यवस्थेविरुध्द वर्तन केले. नेहरुंच्याच कार्यकाळात प्रांतीय मंत्रिमंडळाची निवड व आकार संबंधी संसदीय बोर्डाची मान्यता घेतली जात असत. या सर्व बाबी भारताच्या संघात्मक व्यवस्थेला एकात्मक बनवण्याच्या दिशेत प्रभावी सिध्द झाले. नेहरुंनी आपल्या कार्यकाळाच्या उत्तरार्धात कामराज योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय कॉंग्रेसच्या

संघात्मक स्वरुपास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी कॉंग्रेसचे अध्यक्ष कामराजला बनविले. नव्या नेत्याची निवड करण्याच्या प्रकरणात राज्याच्या मुख्यमंत्र्याचे महत्व सिध्द केले. कोणासही आपला उत्तराधिकारी म्हणुन निवडले नाही. परंतु लोकशाही मार्गाने आपला उत्तराधिकारी निवडण्याची राजकीय पार्श्वभुमी तयार केली. नेहरुंनी तयार केलेल्या राजकीय पृष्ठभुमिवरच कॉंग्रेस अध्यक्ष कामराजने नेहरुंच्या मृत्युनंतर राज्यांचे मुख्यमंत्री, कॉंग्रेस कार्यकारणी समितीचे सदसय संसदीय पक्षाचे पदाधिकारी आणि जवळपास दोनशे संसद सदस्यांशी विचार विनिमय करुनच संसदीय पक्षाच्या बैठकीत सांगितले की, संसद सदस्य आणि इतर पक्षांचे सर्वात अधिक समर्थन लाल बहादुर शास्त्रीस असल्याचे सांगितले. शास्त्री हे सर्वमान्य नेता होते. नेहरुंच्या मृत्युनंतर कमीतकमी दिवसात नेहरुंचा उत्तराधिकारी निवडण्यात आला. भारतीय राजकारणाने दुसऱ्या युगात प्रवेश केला. परंतु यामुळे देशाचे ऐक्य नष्ट झाले नाही न पक्षाचे. शास्त्रींच्या मृत्युनंतरही हीच प्रक्रिया स्विकारुन इंदिरा गांधींना संसदीय पक्षाचा नेता म्हणुन निवडले.

नेहरु आणि शास्त्रींच्या मृत्युनंतर झालेल्या चौथा सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसची एकाधिकारशाही नष्ट झाली. प्रादेशिक स्तरावर पक्ष बदलाच्य आधाराने संयुक्त आघाडी शासन बनवण्याच्या प्रवृत्तीने राजकीय पक्षाच्या संघात्मक व संस्थात्मक स्वरुपास नष्ट केले. विधानसभांच्या पातळीवर ज्या आघाडी राजकारणाचा प्रारंभ झाला. त्यात राजकीय पक्षाचे सिध्दांत निष्ठा, पक्षीय निष्ठा आणि पक्षीय शिस्तीस संपवले. शासनास राजकारणरुपी बाजारात सौदयाची वस्तु बनवले. निवडणुकींचे राजकारण आणि सत्ता राजकारणात जो पोकळपण निर्माण झाला त्यात भारताच्या विविधतापुर्ण समाजाच्या सामुहिक हिताचे निवडणुकीची अभिव्यक्तींचा आधार जात, वर्ग आणि संप्रदायाला बनवले. सातव्या दशकात जात, वर्ग आणि संप्रदायी लोकसंख्येच्या आधारावर पक्षामार्फत उमेदवाराची निवड होऊ लागली. यामुळे संघराज्याच्या शक्ती असणाऱ्या राष्ट्रीयता आणि स्वायत्तेच्या समन्वित विकास अवरुध्द होईल. संघराज्य आणि पक्षपध्दती अनिश्चितता आणि उद्देश हीनतेची शिकार बनले. याचकाळात जात व वर्ग आधारित नेतृत्वाचा विकास झाला. ज्यामुळे केंद्र आणि राज्याच्या संबंधात राजकीय पक्षाच्या नेतृत्वाची महत्वकांक्षानुरुप व्यवस्थित झाले. तसेच राजकीय पक्षाचे संघटन ही नेतृत्वाच्या महत्वकांक्षेनुरुपच ही व्यवस्थीत झाले.

केंद्रातील सत्तारुढ कॉंग्रेस पक्षाच्या विभिन्न राजकीय रणनीतीमुळे बिगर कॉंग्रेसी राज्यशासनास उधळणे, विधानसभांना भंग करणे आणि राष्ट्रपती शासन लागु करने इ. उपाय मार्फत केंद्र आणि राज्याच्या संबंधाला अश्चिततेच्या दिशेने नेले. ज्यामुळे प्रादेशिक जातीवाद व वर्गवादी राजकीय पक्षाच्या विकासाचा मार्ग प्रशस्त झाला. राष्ट्रीय पक्षांचा जनाधार कमी झाला. अशास्थितीत राज्यपाल आपल्या दुहेरी भुमिकेत संतुलन स्थापन करण्यात असमर्थ बनले. एकाबाजुने राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास झाला. दुसऱ्या बाजुने केंद्र शासनाच्या सत्ता वर्चस्वाच्या हस्तक्षेपामुळे राज्यांच्या स्वायत्ततेचा ऱ्हास झाला.

अशा दिशाहीन पक्षीय व्यवस्थेच्या काळात 1971 च्या मध्यावर्ती निवडणुका

VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

बांग्लादेशाची निर्मिती, 1972 मधील विधानसभा निवडणुकानंतर संघ व संघीय घटकावर इंदिराजींची एकाधिकारशाही स्थापित झाली. संपूर्ण संघात्मक व्यवस्था आणि इंदिरा कॉंग्रेसचे संघटन इंदिराजींच्या महत्वकांक्षेनुसार व्यवस्थित संचलित होत होते. इंदिरा गांधींच्या काळात दोन प्रकारचे केंद्र राज्य संबंध विकसित झाले. कॉंग्रेसशासित राज्यात पक्षप्रमुखाकडुन मुख्यमंत्र्यांची निवड होण्याच्या प्रक्रियेमुळे मालक व नौकराचे संबंध निर्माण झाले. तर बिगर कॉंग्रेस शासित राज्यात विशेषतः प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व असणाऱ्या राज्यात विरोधासाठी विरोध यावर आधारीत प्रतिस्पर्ध्यांचे संबंध विकसित झाले.

अशाप्रकारे कॉंग्रेसशासित राज्यात केंद्रीयप्रवृत्तीमुळे स्वायत्तेच्या प्रक्रियेला खीळ बसली, तर प्रादेशिक पक्षामार्फत राज्यात अत्याधिक स्वायत्ततेच्या मागणीमुळे राष्ट्रीयत्वाच्या विकासाची प्रक्रिया खंडीत झाली. कांही प्रांतात पृथकतावादी प्रवृत्तीचा विकास झाला. अशास्थितीत इंदिरा गांधींनी मुख्यमंत्र्यांच्या सल्याने राज्यपालाची होणारी निवडीची परंपरा नष्ट केली. राज्यघटनेचे संरक्षक म्हणुन कार्य करणाऱ्या न्यायपालिकेच्या अधिकारक्षेत्रात घटना दुरुस्तीच्या माध्यमातुन अतिक्रमण केले. परिणामतः न्यायाधिशांची निवड व बदली यास पक्षीय राजकारणाने घेरले. इंदिरा गांधीपासुन राजीव गांधीच्या काळापर्यंत प्रादेशिकतेचा विकास समान रुपात झाला.

1977 साली इंदिरा गांधीच्या हुकूमशाही शासनास नष्ट करुन विभिन्न राष्ट्रीय पक्षाच्या एकत्रीकरणातून निर्माण जनता पक्ष शासनात आले. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात पहिल्यांदाच कोणत्याही घटनात्मक तत्वांचा आधार न घेता 08 कॉंग्रेस शासित राज्यातील शासनांना बरखास्त करुन नव्या जनदेशामुळे विधानसभा गठित करण्याचे आदेश देण्यात आले. याच प्रक्रियेस इंदिरा गांधींनी 1980 साली सत्ता मिळाल्यास चालु ठेवले. त्यांनी 13 राज्यातील बिगर कॉंग्रेसीच शासनास बरखास्त केले. या दोन्ही घटना भारतीय संघराज्याची निर्घुण हत्या करणाऱ्या ठरल्या. 1880 ते 1984 पर्यंत भारताच्या राजकीय मंचांवर पृथकवादी व सांप्रदायिक तत्व आणि प्रादेशिक पक्षांचा प्रभाव तीव्र गतीने वाढला. पंजाबात खलिस्तानची मांगणी तीव्र गतीने पुढे आली. आसामात आसाम गण परिषदेच्या नेतृत्वाने बंडखोरी केली. मिजोरामात लालडेंगाच्या नेतृत्वात मिजोफ्रंट ने विद्रोहाचा मार्ग स्विकारला. काश्मिरात फारुख अब्दुल्लाने विरोधाचा आवाज वाढवला. पक्ष पध्दतीची विभागणी व प्रादेशिक पक्षाच्या दबावामुळे इंदिरा गांधीनी केंद्र- राज्य संबंधावर अहवाल देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आर.एस.सरकारियाच्या नेतृत्वात सरकारिया आयोग स्थापन केला. 1983 च्या विधानसभा निवडणुकीत आंध्रात तेलगु देसम आणि कर्नाटकात क्रांतीरंगा पक्षाच्या समर्थनाने जनता पक्ष सत्तेत आला. पंजाबच्या अकाली दलाने आनंदपूर साहब अहवाल निश्चितच एक पृथकतावादी दस्तावेज बनले. ज्याचे रुपांतर इंदिराजींच्या निर्घुण हत्येत झाले.

1994 साली राजीव गांधी देशाचे पंतप्रधान झाले. या शासनाने प्रारंभीकाळात केंद्रराज्य संबंधात तणावाऐवजी सहकार्यांचे धोरण स्विकारले. पंजाबातील लोंगोवाल करार आसामातील आसाम करार, मिजोरामातील लालडेंगासोबत करार, तामिळनाडुतील अण्णाडीएमके आणि काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्ससोबत ताळमेळ व समन्वयाचे धोरण आखून राज्यासोबत

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

संघर्षाऐवजी सहकार्याच्या नितीने चालण्याचे संकेत दिले. परंतु गैर-काँग्रेसी शासनानी सामुहिकपणे विरोध केल्यामुळे यास्थितीत बदल झाला. शेवटी याही शासनाने काँग्रेस व बिगर काँग्रेस राज्यासोबत इंदिरा व जनता पक्षाने घेतलेल्या धोरणाचा अवलंब केला. अशाप्रकारे 1971 ते 1988 पर्यंत सत्ताभिलाषी राजकीय पक्षांनी मनमानेल पध्दतीने राज्य शासनाचे संचलन केले. तर दुसऱ्या बाजुने प्रादेशिक सत्ताधारी व इतर पक्षांनी केंद्र शासनाच्या हुकूमशाही प्रवृत्तीविरुध्द स्वायत्तेचा आवाज बुलंद केला. परिणामतः भारताचे घटनात्मक संघराज्य तणावग्रस्त निष्क्रिय व लकवा मारलेल्या माणसाप्रमाणे बनले. व्यक्ति नियंत्रित व प्रभावित राष्ट्रीय पक्षाचे संघटन व निर्णय निर्धारण प्रक्रियेच्या केंद्रीकरणाने प्रादेशिक राजकीय पक्षास संघटित व विकसित केले.

... VYAPARI EDUCA... DEGLOOR COLLEGE ... Dist. Nanded

1989 साली प्रादेशिक पक्षाचे नेता एन.टी.रामाराव, देवीलाल आणि व्ही.पी.सिंहाच्या नेतृत्वाने जनता दल , तेलगु देसम, डी.एम.के चे संघटन काँग्रेस आणि आसाम गण परिषदे दरम्यान पक्षीय आघाडीमुळे एका राष्ट्रीय मोर्चाचा उदय झाला. लोकसभेच्या निवडणुकीत सर्वसामान्य मतदारांनी त्यास विजय बनवुन शासन बनवण्याचां अधिकार दिले. या घटनेपासूनच भारतीय संघराज्याने नवा अवतार धारण केला. 1989 चा राष्ट्रीय मोर्चा भारतीय संघराज्याच्या पुर्नजन्मात महत्वाचा पाऊल बनला. भारतीय संघराज्यास पुनर्जीवित करणाऱ्या ज्या करारात्मक राजकारणाचे बीजारोपण 1967 मध्ये राज्यस्तरावर झाले. त्याचाच विकास 1977 ला राष्ट्रीय स्तरावर झाला. तेच करारात्मक राजकारण 1989 मध्ये संघराज्याचा विकास करण्यातील सुदृढ आधार बनला. प्रथमच प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय पक्षासोबतच संघीय शासनाच्या निर्मितीत सहभागीत्व देण्यास प्रारंभ केले. प्रथमच मतदारांनी काँग्रेसला पर्याय म्हणून कोणत्या एका पक्षाच्या किंवा आघाडी ऐवजी प्रादेशीक व राष्ट्रीय पक्षांनी निर्माण केलेल्या राष्ट्रीय मोर्चास निवडले. ज्यात सर्व पक्षाची स्वतंत्र ओळख होती. प्रथमच संघराज्यात राष्ट्रीयत्व व स्वायत्तेस समान महत्व प्राप्त झाले. पक्षीय आघाडयांच्या इतिहासात प्रथमच जेंव्हा राज्यांच्या स्वायत्तेचा सन्मान व्हावा आणि हुकूमशाही केंद्राच्या विरोधात राजकीय कार्यवाही करणारा संघात्मक मंचाची बांधणी झाली. प्रथमच प्रादेशीक पक्ष राष्ट्रीय मोर्चात सहभागी होवून पृथकवादी प्रादेशिकतेला राष्ट्रीय संदर्भ देण्याची प्रक्रिया राबवली. मतदारांच्या बदलत्या मानसिकतेमुळे राष्ट्रीय नेत्यात जी भावना विकसित झाली आणि राष्ट्रीय राजकीय पक्षाच्या जनाधारात जी घसरण झाली त्यामुळे प्रादेशिक नेत्यांना राष्ट्रीय स्तरावरच्या नेत्यात समस्तरीय होण्याची भावना विकसित झाली. अगोदर पक्ष महत्वाचे होते आता मोर्चा महत्वाचा बनला.

भारतीय राजकारणाच्या आधारभुत घटकात होणाऱ्या बदलाने प्रादेशिक पक्षाचा प्रभाव व प्रतिनिधित्व संघ शासनात वाढले. 1989 पासुन 1997 पर्यंत झालेल्या पाच सर्वांत्रिक निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्ष किंवा आघाडीस स्पष्ट बहुमत मिळाले नाही. या सर्व निवडणुकीत प्रादेशिक पक्षाचे प्रतिनिधीत्व वाढले. राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधीत्व कमी झाले. 1989 च्या संसदीय निवडणुकीत प्रादेशिक पक्षाचे प्रतिनिधीत्व 27 होते. 1951 मध्ये 55, 1969 मध्ये 131, 1998 मध्ये 150, 2004 ला 159 झाले. 1989 ते 2009 पर्यंत मतदारांचा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

कौल एकपक्षीय न होता बहुपक्षीय बनला. एकलवादी न होता बहुलवादी बनला. एकात्म न होता संघात्म बनला. या जनादेशाच्या दबावामुळेच भारतीय जनता पक्षास आपल्या एकात्म राष्ट्रवादाच्या विचारास त्यागुन संघात्मक राष्ट्रवादाचे समर्थन करण्यास मजबुर व्हावे लागले. विविधतेत एकता या घोषणाबाजीत एकतेवर भर होता. परंतु समाजाची बदलत्या स्थितीत एकता विविधतेच्या अस्तित्वाची प्राथमिक अट नाही. स्वातंत्र्यानंतर जर भारतीय संघराज्यास फाळणी व भाषीकवादाने नवे रुप दिले. तर आज मागास व दलित जातींच्या उदयाने विकसित प्रादेशिक पक्ष आणि नैसर्गिक साधनसंपत्तीनंतर उपभोगाच्या राजकारणाने संघराज्यास नवे रुप प्राप्त झाले.

भारतात 1990 च्या राजकारणात अनेक नवनवीन बदल झाले. ज्यात नव उदारमतवदी व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा स्विकार करण्यात आला. त्यासोबतच प्रादेशिक , जातीय व सामाजिक संरचनेतील बदलाने सर्व संघराज्याच्या प्रक्रियेला बदलून ठेवले. आज घटनात्मक तरतुद जशाच तशी आहे परंतु केंद्र - राज्य संबंधात बदल होत आहे. आर्थिक उदारीकरणामुळे राज्यांना आर्थिक स्वायत्तता प्राप्त झाली. तर अखंडीत पक्ष व्यवस्था आणि केंद्रात कोणत्याही एका पक्षास न मिळणाच्या बहुमतामुळे (अपवाद 2014) राज्यांना राजकीय स्वायत्तता प्राप्त झाली. भारताच्या पक्षीय व्यवस्थेतील बदलामुळे प्रतिस्पर्धी संघराज्याचा उदय झाला. तर दुसरीकडे संघराज्य लोकशाहीस सुदृढ आधार प्राप्त झाले. या परिवर्तित पक्षीय व्यवस्थेमुळे कलम 356 च्या दुरुपयोगावर विरामचिन्ह लागले. 1950 ते 1989 पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवटीची घोषणा 89 वेळेस झाली. ज्यात नेहरुंच्या 14 वर्षाच्या काळात फक्त 5 वेळा राष्ट्रपती शासनाची घोषणा झाली. तर इंदिरांच्या काळात 15 वर्षात 58 वेळा राष्ट्रपती शासनाची घोषणा केली. जनता पक्षाने आपल्या अल्पावधीत 16 वेळा राष्ट्रपत्री शासनाची घोषणा केली. परंतु 1994 ते 2000 पर्यंत फक्त 4 वेळा राष्ट्रपती शासनाची घोषणा करण्यात आली.

आज भारतीय संघराज्य बदलत्या परिवेशात सशक्त होत आहे. कारण प्रादेशिक पक्षांचे संघीय शासनातील भागीदारीने केंद्रीय शासनाचे राज्यातील हस्तक्षेप कमी झाला. केंद्रीकरणाच्या प्रवृत्तीवर विरामचिन्ह लागले. परंतु 2014 च्या बहुमतवाल्या संघ शासनामुळे केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढल्याचे चिन्ह जाणवते. राष्ट्रीय राजकीय पक्षांची ताकत प्रादेशिक राजकीय पक्षावर अवलंबुन राहिली तर 2014 च्या निवडणुकीत लोकांनी संघास व केंद्रीय राष्ट्रीय पक्षास सक्षम बनवले. राष्ट्रीय पक्ष प्रादेशिक पक्षांच्या अटींवर सामंजस्य करण्यास तयार झाले. पुर्वी राष्ट्रपतीची निवड मन मानेल पध्दतीने होत असत. आता प्रादेशिक पक्षांचे समर्थन मिळवणे सत्ताधारी राष्ट्रीय राजकीय पक्षाची मजबुरी बनली. वर्तमान केंद्रातील बहुमतातले मोदी शासन याबाबत काय भूमिका घेते ते पाहु ? ज्यावर केंद्र - राज्य संबंधाबाबतचा नवा अध्याय लिहिला जाईल. पुर्वी प्रादेशिक पक्ष पंतप्रधानाचे पद मिळवण्याचे स्वप्न पण पहात नव्हते. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत लोकांनी दिलेला बहुमताचा कौल तीच अवस्था उत्पन्न करतोय. परंतु मध्यंतरीच्या काळात बदलत्या राजकीय स्थितीने प्रादेशिक पक्षाच्या नेत्यात पंतप्रधानाचे स्वप्न रंगवले. पुर्तता देवेगौडाच्या पंतप्रधान बनण्यातुन झाली. तर शरद

पवार, मुलायमसिंह यादव यांच्यासारखे या आशेने आणखीन राजकारणात तग धरून तशा पध्दतीचे प्रयत्न यांनी 2004 व 2009 च्या निवडणुकीत केले. पुर्वी पंतप्रधान व मंत्रिमंडळामार्फत राष्ट्रपती शासनाच्या प्रस्तावास पुर्नविचारासाठी वापस करण्याचे धाडस राष्ट्रपती करत नव्हते. 1990 च्या दशकात राष्ट्रपती के.आर.नारायणन यांनी कल्याण सिंह शासनाला पाडण्यासाठी पाठवलेल्या राष्ट्रपती शासन प्रस्तावास पुर्नविचार करण्याचा आग्रह केला. वाजपेयी शासनाने 22 डिसेंबरला राबडीदेवी शासनाला राष्ट्रपति शासनाच्या साह्याने बरखास्त करण्याचा प्रस्ताव ठेवला पण त्यासही निरस्त केले.

पुर्वी 356 कलमाच्या दुरुपयोगास सर्वोच्च न्यायालयही रोखू शकत नव्हते. परंतु 1994 साली एस.आर.बोम्मई विरुध्द भारत सरकार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने कलम 356 च्या वापरास न्यायालयीन समीक्षेच्या अंतर्गत घेवुन त्याच्या दुरुपयोगावर मर्यादा आणल्या. पुर्वी कलम 356 चा वापर अधिक प्रमाणात पक्षीय राजकारण व स्वार्थी भावनेने प्रेरित होवुन होत. ज्यामुळे भारतीय संघराज्य निष्प्राण व जडवादी बनत होते. परंतु आता तसे करणे शक्य नाही. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय राज्य स्वायत्तेच्या विकासात एक क्रांतीकारी पाऊल आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य स्वायत्ततेच्या दिशेने याही पुढे जावुन 2007 साली नवव्या अनुसूचीतील तरतुदींना न्यायिक समीक्षेअंतर्गत घेतले. न्यायालयाने हा निर्णय आई.आर.कोयल्लो विरुध्द तामिळनाडू राज्य या खटल्याच्या सुनावणीत हा निर्णय घेतला. पहिल्या घटनादुरुस्तीने यास न्यायिक समीक्षेच्या कक्षेबाहेर ठेवले होते. केंद्रात जेंव्हा एकपक्षीय शासनाच्याऐवजी बहुपक्षीय शासन स्थिरावले तेंव्हाच न्यायालय याबाबत आवाज उठवताना जाणवते. न्यायालय श्रेष्ठ का संसद ? हा वाद अलिकडे निर्माण होण्याच्या अनेक कारणापैकी हे एक कारण आहे. पक्ष पध्दतीतील बदलामुळेच एन.सी.टी.सी. (नॅशनल काऊंटर दहशतवाद सेंटर) बाबत केंद्र आणि राज्यात वादविवाद निर्माण झाला. ओरिसाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक आणि गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदीने एन.सी.टी.सी. राज्यघटनेतील कलम 246 मध्ये केंद्र-राज्य अधिकाराचा वाद आहे. भारतीय पोलिस अधिनियम 1861 चे उल्लंघन वाढत आहे. यात परत घेवून त्यात सुधारणा करण्यावर भर दिला.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारतीय संघराज्यात केंद्र आणि राज्यांनी आपापल्या विकासासाठी वयैक्तीक स्तरावर प्रयत्न चालवले. या प्रयत्नामुळे भारतीय संघराज्य बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. परिणामतः संघीय सार्वभौमात संघीय निर्णय-निर्धारण प्रक्रियेत आणि संघीय धोरण निर्धारण प्रक्रियेच्या कार्यानवयीत राज्याची भागीदारी वाढत आहे. जागतिकीकरणाचे फायदे मिळवण्यासाठी संघाच्या घटकात प्रतिस्पर्धा वाढत आहे. आज भारतातील राज्य परकीय आर्थिक गुंतवणूकदारांना आमंत्रित करुन आपल्या राज्यात उद्योगधंदे उभा करत आहेत. आपल्या राज्यातील सामाजिक, आर्थिक पायाभुत सुविधांच्या निर्मिती व विकासासाठी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्राकोष आणि आशियाई विकास बँक, ब्रिक्स इ. संस्थाकडून कर्ज प्राप्त करण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न होत आहेत. भारतीय संघराज्यातील हा एक नवीन बदल आहे. घटक राज्य आपले व्यापार धोरण व औद्योगिक धोरणांची घोषणा

करत आहेत. ज्यामुळे राज्यामार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती उद्योगपतींना दिली जाते. यामुळे घटकराज्याचे मुख्यमंत्री खाजगी कंपन्यांच्या कार्यकारी अधिकाऱ्याप्रमाणे(CEO) राज्याच्या विकास व प्रगतीचा प्रयत्न करत आहेत. यामुळे घटकराज्याचा आत्मविश्वास वाढत आहे. त्यांच्या निर्णय क्षमतेत वाढ होत आहे.

केंद्रराज्य संबंध एका नव्यायुगात प्रवेश करत आहेत. आज होणारे हे परिवर्तन यामुळे शक्य आहे की, कोणत्याही राजकीय पक्षाचे संघीय शासनात एकाधिकार नाही. परंतु 2014 ला केंद्रात भारतीय जनता पक्षांचे बहुमतातले शासन आले. भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीपासुन ते आतापर्यंत संघराज्याचा विकास पहाता त्याचे रुपांतरण के.सी.व्हियरच्या भाषेत खालील दिशेने झाले. अर्ध संघराज्यसह्योगी संघराज्य - सौदेबाजी संघराज्य - प्रतिस्पर्धी किंवा बाजारु संघराज्य ई. आज भारतीय संघराज्याची सर्वात मोठी समस्या आहे की पक्षीय नेतृत्वाच्या व्यक्तिगत महत्वकांक्षेनुसार केंद्र-राज्य संबंधाचे होणारे निश्चितीकरण.

भारतीय संघराज्याच्या संचालनाची मुख्य जबाबदारी लोकप्रतिनिधींची आहे. लोकप्रतिनिधी अनेक संस्था व संघटनाच्या नियम व अटींनी बांधले असतात. यात प्रामुख्याने राजकीय पक्ष, दबाव गट, उद्योगपती व आंतरराष्ट्रीय परिस्थिती यांचा वाटा महत्वाचा आहे. यामध्ये प्रामुख्याने राजकीय पक्षाचे नेतृत्व (हायकयान) त्यांचे धोरण व विचारसरणीत लोकप्रतिनिधी बंदिस्त होते. त्यामुळे लोकशाही प्रधान शासन व संविधानात या लोकप्रतिनिधीकडून लोकशाही मुल्यांची उधळण होत नाही. लोकशाहीत होणाऱ्या राजकीय नेतृत्वाचा उदय व विकास लोकशाही मुल्याने प्रेरित असावा तेंव्हा राष्ट्रीयत्व, स्वायत्त विकास व संविधानातील तत्वाप्रमाणे संघराज्याचे संचलन करता येईल.


**संदर्भ**

१) बी.एल.फाडिया, भारतीय शासन एवं राजनिती - साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.

२) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - डॉ.भा.ल.भोळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स , नागपूर.

३) Constitutional Development and National Movement of India - R.C.Agrawal S.Chand & Company Ltd. New Delhi.

४) भारतीय राज्यघटना स्वरुप व राजकारण - प्रा.चिं.ग.घांगरेकर श्री मंगेश प्रकाशन- नागपूर

५) Understanding Contemporary issues in India - vivek S.Raj - Civil Services Times, New Delhi.



**प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड
मो.नं. ०९४२२४३९२७६


❁❁❁


ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

**Dr. Anil Chidrawar**
**I/C Principal**
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded